महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना – महाराष्ट्र
जिल्हाधिकारी कार्यालय, बुलडाणा
ईमेल – dpc.cgsbuldhana@gmail.com

सत्यमेव जयते

जा.क्र./कावि/रोहयो/लेखा/७२/२०२३ दिनांक :- ०८ ऑगस्ट, २०२३

प्रति,

मा.उपसंचालक (माहिती)
विभागीय माहिती कार्यालय,
मांगीलाल प्लॉट, कॅम्प रोड अमरावती.

विषय :- जिल्हा स्तरावर साधन व्यक्ती यांचे पॅनल तयार करणे बाबत.

संदर्भ :- मा.प्रधान सचिव (रोहयो), महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.साव्यसे-३१२३/प्र.क्र.५८/साअंसो
दिनांक २४ जुलै, २०२३

*********

उपरोक्त संदर्भांकित पत्रान्वये जिल्ह्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना सामाजिक अंकेक्षण प्रक्रिया ही वेळोवेळी नेमण्यात येणाऱ्या ग्राम / समूह / तालुका साधन व्यक्ती यांच्या मार्फत सातत्य व गुणवत्ता राखण्यासाठी तालुका / समूह / ग्राम पातळीवर नियुक्त करण्यात येणाऱ्या साधन व्यक्ती यांना वारंवार प्रशिक्षण देवून त्यांची कौशल्य वृध्दी करणे आवश्यक असते. दरवर्षी अंकेक्षणाच्या वेळी प्रत्येक जिल्ह्यात नवीन उमेदवारांची साधन व्यक्ती म्हणून निवड करणे व त्यांना नव्याने प्रशिक्षण देणे यामुळे कालापव्यय होतो व अंकेक्षणाचा खर्च वाढतो. हे विचारात घेता सामाजिक अंकेक्षणासाठी प्रत्येक जिल्ह्यात साधन व्यक्ती यांचे पॅनल तयार करावयाचे आहे.

साधन व्यक्ती पदावर दैनंदिन मानधन तत्वावर पॅनलवर नियुक्तीसाठी निवडप्रक्रिया कार्यक्रम खालीलप्रमाणे:

| अ.क्र. | तपशिल | दिनांक |
|---|---|---|
| १ | बुलढाणा जिल्ह्यातील जास्त खप असलेल्या एका स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात | ०९/०८/२०२३ |
| २ | वेबसाईट सविस्तर जाहिरात प्रसिध्द करणे | ०९/०८/२०२३ |
| ३ | उमेदवाराची अर्ज प्राप्त करण्याची मुदत | २५/०८/२०२३ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत |
| ४ | उमेदवारांच्या अर्जांची छाननी | ०१/०९/२०२३ पावेतो |
| ५ | मुलाखतीस पात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द | जिल्ह्याच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. मुलाखतीबाबत स्वतंत्ररित्या पत्रव्यवहार करण्यात येणार नाही. |
| ६ | मुलाखतीची वेळ व तारीख | |
| ७ | पात्र उमेदवारांच्या मुळ प्रमाणपत्रांची पडताळणी व नियुक्तीपत्रे देणे | |

करिता सदर पत्राची जाहिरात दिनांक ०९ ऑगस्ट, २०२३ च्या स्थानिक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात यावी व त्याची प्रत या कार्यालयास सादर करावी. जाहिरातीचा नमुना सोबत जोडण्यात आलेला आहे. मुलाखतीसाठी बोलाविण्यात येणाऱ्या उमेदवारांची यादी जिल्ह्याच्या संकेतस्थळावर (https://www.buldhana.nic.in) प्रसिध्द करण्यात येईल. मुलाखतीबाबत स्वतंत्र पत्रव्यवहार करण्यात येणार नाही.

सही/-
(सुरेश थोरात)
उपजिल्हाधिकारी (रोहयो) तथा
उपजिल्हा कार्यक्रम समन्वयक, बुलढाणा

प्रतिलिपी :-

१. मा.प्रधान सचिव (रोहयो), महाराष्ट्र शासन, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा.संचालक, महाराष्ट्र राज्य सामाजिक अंकेक्षण व पारदर्शकता सोसायटी, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
३. जिल्हा माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, राष्ट्रीय सूचना केंद्र बुलढाणा यांनी सदर जाहिरात जिल्ह्याचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येऊन तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

०८.८.२३
(सुरेश थोरात)
उपजिल्हाधिकारी (रोहयो) तथा
उपजिल्हा कार्यक्रम समन्वयक, बुलढाणा

Scanned with CamScanner

# जाहिरात

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत ग्राम पातळीवर केलेल्या कामाचे सामाजिक अंकेक्षण करण्यासाठी साधन व्यक्तींची नियुक्ती करण्यात येणार आहे. ही नियुक्ती महाराष्ट्र राज्य सामाजिक अंकेक्षण व पारदर्शकता सोसायटीच्या पॅनलवर करण्यात येणार आहे. यासाठी विहित पात्रता धारण करणारे इच्छुक उमेदवारांकडून दिनांक २५/०८/२०२३ पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत. अर्जाचा नमुना व सदर पदासाठी पात्रता व आवश्यक कागदपत्रे याचा सविस्तर तपशील जिल्हाधिकारी, बुलढाणा या कार्यालयाच्या https://www.buldhana.nic.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आला आहे. उमेदवारांनी त्यांचे विहित नमुन्यातील अर्ज उपजिल्हाधिकारी (रोहयो) जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा या कार्यालयात दिनांक २५/०८/२०२३ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत (शासकीय सुटीचे दिवस वगळून) पोहोचतील अशा बेताने सादर करावे. विहित कागदपत्रे सोबत नसलेले व अपूर्ण माहितीसह प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

क्र.मगांराग्रारोहयो/जाहिरात/ १ /२०२३
जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा
दिनांक :- ०८ ऑगस्ट, २०२३

०८.८.२३

(सुरेश थोरात)
उपजिल्हाधिकारी (रोहयो) तथा
उपजिल्हा कार्यक्रम समन्वयक, बुलढाणा



Scanned with CamScanner

# महाराष्ट्र राज्य सामाजिक अंकेक्षण व पारदर्शकता सोसायटी, मंत्रालय, मुंबई

## मग्रारोहयोचे सामाजिक अंकेक्षण करण्यासाठी
## साधन व्यक्ती पदावर दैनंदिन मानधन तत्वावर पॅनलवर नियुक्तीसाठी इच्छुक व पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविणेबाबत – जाहिरात

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत करण्यात येणाऱ्या कामांचे ग्रामपंचायत पातळीवरील सामाजिक अंकेक्षण करण्याची जबाबदारी महाराष्ट्र राज्य सामाजिक अंकेक्षण व पारदर्शकता सोसायटीवर सोपविण्यात आली आहे. या कामकाजासाठी ग्राम पातळीवर विविध घटकांचे प्रतिनिधींमधून साधन व्यक्तींची नियुक्ती सोसायटीच्या पॅनलवर दैनंदिन मानधन तत्वावर करण्यात येते. यासाठी खालील अटी व शर्ती पूर्ण करणाऱ्या इच्छुक उमेदवारांकडून विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर पदावर १०० पात्र उमेदवारांची पॅनलवर नियुक्ती करावयाची आहे.

इच्छुक व पात्र उमेदवारांनी सोबत जोडलेल्या नमुन्यात आपला अर्ज स्व:हस्ताक्षरात भरुन आवश्यक कागदपत्रासह उपजिल्हाधिकारी रोहयो कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा या कार्यालयात दिनांक २५/०८/२०२३ पर्यंत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत (कार्यालयीन दिवशी) पोहोचतील असे बेताने सादर करावे. विहित कागदपत्रे सोबत नसलेले व अपूर्ण माहितीसह प्राप्त झालेले अर्ज तसेच ई-मेलद्वारे प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

**नियुक्तीच्या अटी व शर्ती :-**

१. साधन व्यक्ती पदासाठी सोबत पदर्शित केलेल्या विहित नमुन्यात अर्ज सादर करावा.
२. साधन व्यक्ती पदासाठी उमेदवाराचे वय किमान १८ वर्ष असावे. कमाल ५० वर्षापेक्षा जास्त नसावे.
३. ग्राम साधन व्यक्ती पदासाठी उमेदवार किमान १० वी पास असावा. १० वी पास उमेदवार उपलब्ध न झाल्यास किमान ८ वी पास असलेल्या उमेदवाराचा निवडीसाठी विचार केला जाईल. यासाठी कमाल शिक्षणाची मर्यादा नाही.
४. सामाजिक अंकेक्षण प्रक्रियेच्या कामकाजाचा अनुभव असलेल्या उमदेवारांचा प्राधान्याने विचार केला जाईल.
५. साधन व्यक्तींची निवड करताना पुढील गटातील व्यक्ती यांना प्राधान्य राहील.
   १. प्रोजेक्ट लाईफ मध्ये काम केलेले मजूर (अ.जा./अ.ज. मधील महिलांना प्राधान्य)
   २. मग्रारोहयो वर काम केलेले मजूर (अ.जा./अ.ज. मधील महिलांना प्राधान्य)
   ३. जॉब कार्डधारक मजूर (अ.जा./अ.ज. मधील महिलांना प्राधान्य)
   ४. यापूर्वी सामाजिक अंकेक्षण प्रक्रियेमध्ये काम केलेले उमेदवार
   ५. भारत निर्माण सेवक / इतर शासकीय योजनेमध्ये क्षेत्रीय कामकाज केलेले उमेदवार / स्वयंसेवी संस्थेमध्ये क्षेत्रीय कामकाज केलेल उमेदवार (अ.जा./अ.ज. मधील महिलांना प्राधान्य)
   ६. जॉब कार्ड नसणारे परंतु कुटूंब पत्रकात समाविष्ट असलेली मुले / मुली (किमान वय वर्ष १८) (अ.जा./अ.ज. मधील महिलांना प्राधान्य)
   ७. MSW / NSS चे विद्यार्थी (अ.जा./अ.ज. मधील महिलांना प्राधान्य)
   ८. अ.जा./अ.ज. २५% व महिला मजूरांना एक तृतीयांश आरक्षण अनुज्ञेय राहील.
६. छाननी करुन विहित अर्हता व कागदपत्रांसह प्राप्त झालेल्या अर्जाच्या उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल.
७. साधन व्यक्ती म्हणून निवड झाल्यावर ते ज्या गावातील रहिवाशी आहेत त्या गावाची ग्राम पंचायत सोडून नेमुन दिलेल्या अन्य ग्रामपंचायतीत जेथे सामाजिक अंकेक्षण होणार आहे, अशा ठिकाणी निवासी राहून काम करावे लागेल.
८. निवड केलेल्या साधन व्यक्तींना ४ दिवसांच्या निवासी प्रशिक्षणासाठी हजर रहावे लागेल.



Scanned with CamScanner

९. सामाजिक अंकेक्षण प्रक्रिया सुरु असतांना साधन व्यक्तीस अंमलबजावणी यंत्रणेत काम करणाऱ्या अधिकारी, पदाधिकारी किंवा कर्मचाऱ्यांच्या घरी मुक्काम करता येणार नाही.

१०. निवड समिती मार्फत उमेदवारांची पॅनलवर निवड झाल्यानंतर वेळोवेळी देय होणाऱ्या त्यांच्या मानधनाच्या रक्कमा त्यांना बँकेद्वारे अदा करण्यासाठी सोसायटीने निश्चित केलेल्या बँकेत बँक खाते ऊघडावे लागेल.

११. प्रत्यक्ष सामाजिक अंकेक्षण प्रक्रिया सुरु असतांना पॅनल वरील साधन व्यक्तींना आवश्यकतेनुसार काम उपलब्ध करुन देण्यात येईल. सामाजिक अंकेक्षण प्रक्रिया समाप्त होताच साधन व्यक्ती यांना तात्काळ कार्यमुक्त करण्यात येईल.

१२. निवड करण्यात येणाऱ्या साधन व्यक्ती यांना अंकेक्षण प्रक्रियेत सहभागी करुन घेतल्यानंतर त्या कालावधीत सोसायटीने वेळोवेळी ठरवून दिलेल्या दराप्रमाणे त्यांनी केलेल्या कामासाठी मानधन अनुज्ञेय राहील.

१३. अंकेक्षणाचे काम कोणतीही त्रृटी न ठेवता त्यांनी समाधानकारकरित्या काम पूर्ण केल्याची खात्री झाल्यानंतर मानधन त्यांच्या बँक खात्यात जमा केले जाईल.

१४. अंकेक्षणाच्या काळात प्रवास खर्चापोटी सोसायटीने वेळोवेळी ठरवून दिलेलया दराप्रमाणे एकत्रित रक्कम साधन व्यक्तींना अनुज्ञेय राहील.

१५. ग्राम साधन व्यक्ती पदासाठी पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची शैक्षणिक पात्रता, उमेदवारांचा प्रशिक्षणातील सहभाग, तत्परता, कामाची गुणवत्ता, अनुभव या बाबींचा विचार करुन त्यांच्यामधून समूह साधन व्यक्ती व तालुका साधन व्यक्ती या पदावर निवडक उमेदवारांना नियुक्ती देण्याचा विचार केला जाईल.

१६. साधन व्यक्ती पदावर निवड झालेल्या कोणत्याही उमेदवाराला सोसायटीच्या सेवेत कायम स्वरुपी नियुक्ती मिळण्याचा हक्क राहणार नाही.

१७. वरील पदावर निवड व प्रशिक्षण झालेल्या उमेदवारांना सोसायटीला आवश्यक तेव्हा सामाजिक अंकेक्षण प्रक्रियेत सहभागी होणे बंधनकारक राहील. तसे हमीपत्र उमेदवारांना द्यावे लागेल.

******************



Scanned with CamScanner

## महाराष्ट्र राज्य सामाजिक अंकेक्षण व पारदर्शकता सोसायटी, मंत्रालय, मुंबई.

ग्राम साधन व्यक्ती पदावर दैनंदिन मानधन तत्वावर कंत्राटी नियुक्तीसाठी अर्जाचा नमुना

अर्जदाराचा फोटो येथे चिकटवावा

| | | |
|---|---|---|
| १. | अर्जदाराचे पुर्ण नाव | |
| २. | राहण्याचा संपुर्ण पत्ता | |
| ३. | मोबाईल व ई-मेल | मोबाईल नं.<br>ई-मेल |
| ४. | जन्म दिनांक व वय, लिंग | जन्म दिनांक / / वय---- ---वर्ष<br>स्त्री / पुरुष/ तृतीयपंथी |
| ५. | शैक्षणिक पात्रता | |
| ६. | कामाचा अनुभव (साधन व्यक्ती म्हणून केलेल्या कामाचा देखिल उल्लेख करावा.) | |
| ७. | जॉब कार्ड/ आधार कार्ड | जॉब कार्ड नंबर<br>आधार कार्ड नंबर |
| ८. | जातीचा प्रवर्ग | अनु. जाती/अनु. जमाती/इतर ----------- |

अर्जासोबत खालील कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती जोडलेल्या आहेत. (जोडलेल्या कागदपत्रांसाठी चौकटीत √ खुण करावी.)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. | शैक्षणिक पात्रतेसंबंधातील प्रमाणपत्र | | २. | जॉब कार्ड | |
| ३. | शिधापत्रिका | | ४. | जातीचे प्रमाणपत्र | |
| ५. | आधार कार्ड | | ६. | शाळा सोडल्याचा दाखला | |
| ७. | अनुभव प्रमाणपत्र | | ८. | इतर कागदपत्रे असल्यास (तपशिल नमूद करावा.) | |
| ९. | तलाठी/ग्रामसेवक यांच्याकडील रहिवासी दाखला | | | | |

Scanned with CamScanner

<u>उमेदवाराचे संमती पत्र</u>

मी श्री/श्रीमती ---------------------------------------------------------------- वय---------वर्षे लिहून देतो / देते की, साधन व्यक्ती म्हणून पदासाठी सादर केलेल्या अर्जात वर नमूद केलेली सर्व माहीती सत्य आहे. साधन व्यक्ती म्हणून कराव्या लागणाऱ्या कामाबाबत मला माहीती आहे. या पदासाठी विहीत केलेल्या अटी व शर्ती मी वाचल्या असून त्या मला मान्य आहेत. साधन व्यक्ती म्हणून नियुक्ती झाल्यास सदर काम करण्यासाठी आवश्यक हमीपत्र देण्यास माझी संमती आहे.

ठिकाण :

दिनांक: / / अर्जदाराची स्वाक्षरी

Scanned with CamScanner